# कृषि पणन विषयक बातम्या : ऑगस्ट 2023

## शेतकऱ्यांसाठी योजना तयार करा : पणनमंत्री

पुणे : राज्यातील शेतकऱ्यांसाठी धान्य व कडधान्यांची प्रमुख आवक होत असलेल्या सर्व बाजार समित्यांमध्ये शेतमाल तारण कर्ज योजना राबवून शेतकऱ्यांना योजनेचा अधिकाधिक लाभ देण्याची सूचना पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी केली आहे. तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील पायाभूत सुविधांबाबत योजना तयार करण्याच्याही सूचना त्यांनी दिल्या आहेत. राज्य कृषी पणन मंडळाची बैठक गुरुवारी (दि. २४) मार्केट यार्डातील मुख्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्या वेळी त्यांनी ही सूचना केली. राज्यातील काही बाजार समित्या या आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत. त्यांना पायाभूत सुविधा उभारणीसाठी अपेडा, राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या सहकार्यातून योजना तयार कराव्यात. पणन मंडळाच्या हॉर्टिकल्चर एक्स्पोर्ट ट्रेनिंग कोर्समधून निर्यातीमध्ये राज्यातील शेतकरी उद्योजक कसा होईल, विभागीय पातळीवर अधिकाधिक प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात यावेत. बाजार समित्यांचे विकासात्मक कामांसाठीचे पॅनेल तयार करावे, असेही सत्तार यांनी सूचित केले.

Pudhari Dt. 26/08/2023

Agrowon Dt. 26/08/2023

# शिरूर बाजार समितीत रविवारपासून साडेपाचनंतर बाजार सुरू होणार

ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : सध्या शेतकऱ्यांना शेतीमाल विक्री कोणत्या वेळी करावी व खरेदीदारांना कोणत्या वेळी माल खरेदीसाठी यावे याचे नियोजन लावणे अवघड झालेले आहे. त्यामुळे बाजार घटकांना हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. बाजार समितीने रविवार (ता. २७) पासून शेतकरी बाजार दररोज संध्याकाळी ५.३० नंतर सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार शेतकऱ्यांनी नियोजन करून आपला शेतीमाल विक्रीसाठी आणावा, असे आवाहन बाजार समितीचे प्रभारी सचिव अनिल ढोकले यांनी केले.

बाजार समितीकडून प्रसिद्धिपत्रक काढून शेतकऱ्यांना आवाहन केले आहे. त्यामध्ये शिरूर, पारनेर, श्रीगोंदा तालुक्यांतील शेतकऱ्यांनी पिकविलेला भाजीपाला विक्रीसाठी यार्डवर गेली अनेक दिवसांपासून शेतकरी बाजार नियमित भरत आहे. शेतकरी बाजाराचे वेळेअगोदर दुपारी १ ते २ वाजेपासूनच अनेक शेतकरी, खरेदीदार यार्डवर गर्दी करतात. या वेळी ग्राहकांचे प्रमाण कमी असते. त्यामुळे शेतकरी आणि ग्राहक यांच्या हिताचा विचार करून बाजार समितीने हा निर्णय घेतला आहे.

## बाजार समितीने असे केले नियोजन

- शेतकरी बाजारामध्ये शेतीमाल घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांनी संध्याकाळी ५.३० पर्यंत शेतीमाल विक्रीसाठी आणावयाचा आहे.
- भाजीपाला खरेदीदारांनी शेतीमाल खरेदीसाठी संध्याकाळी ५.३० नंतर यार्डवर यावे.
- संध्याकाळी ५.३० च्या अगोदर जर कोणी खरेदीदार शेतीमाल खरेदी करताना आढळला तर त्यास यार्डवर प्रवेश नाकारण्यात येईल.
- यार्डचे बाहेर जर वेळेअगोदर एखाद्या खरेदीदाराने शेतीमाल खरेदी केलेला आहे. असे आढळून आल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल.
- यार्डवरील ठोक व किरकोळ व्यावसायिकांनी संध्याकाळी ५.३० नंतरच यार्डवर येऊन आपली दुकाने लावायची आहेत. त्यापूर्वी कोणीही शेतीमाल विक्रीसाठी ठेवायचा नाही. जर तसे आढळले तर संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे.

Pudhari Dt. 25/08/2023



# कांदा निर्यात शुल्काचा पुनर्विचार करावा

**केंद्राकडे मागणी केल्याची अब्दुल सत्तार यांची माहिती ▪ देशात ४५ लाख टन कांदा शिल्लक**

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**देशात ४० ते ४५ लाख टन कांदा शिल्लक असून, दर महिन्याला १७ ते १८ लाख टन कांद्याची मागणी असते. त्यापैकी शेतकऱ्यांकडे ८ ते १० लाख टन कांदा शिल्लक असून, सप्टेंबर महिनाअखेर नवा कांदा बाजारात येईल. कांदा निर्यातीवरील ४० टक्के शुल्क आकारणीबाबत शेतकऱ्यांच्या भावना समजून घेतल्या असून, केंद्र सरकारने निर्यात शुल्काबाबत पुनर्विचार करावा, अशी मागणी राज्य सरकारने केली आहे. शासन कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याची ग्वाही पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिली.**



पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली कांद्याच्या प्रश्नावरील बैठकीत सहभागी कृषी आयुक्त सुनील चव्हाण, दीपक तावरे, सुनील पवार, शैलेश कोतमिरे व अन्य मान्यवर.

मार्केट यार्डातील राज्य कृषी पणन मंडळाच्या कार्यालयात कांद्यावरील निर्यात शुल्काबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रतिनिधी, व्यापारी, निर्यातदार व कांदा उत्पादक शेतकऱ्यांसमवेत सत्तार यांनी बैठक घेत त्यांची मते जाणून घेतली. या वेळी राज्याचे कृषी आयुक्त सुनील चव्हाण, राज्याचे पणन संचालक शैलेश कोतमिरे, राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, राज्य वखार महामंडळाचे अध्यक्ष दीपक तावरे, निवृत्त पणन संचालक सुनील पवार आदी उपस्थित होते.



सत्तार म्हणाले, केंद्र सरकारने भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन संघ (नाफेड) आणि भारतीय राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघामार्फत (एनसीसीएफ) राज्यातील २ लाख मेट्रिक टन कांदा २ हजार ४१० रुपये प्रति क्विंटल या दराने खरेदी करण्यास काही खरेदी केंद्रावर सुरुवात झाली आहे. आणखी खरेदी केंद्रे सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जातील. बाजारात अठराशे ते दोन हजार रुपये दर असताना खरेदी दर हा बाजाराच्या दरापेक्षा जादा आहे. राज्य सरकारने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ३५० रुपये प्रतिक्विंटलप्रमाणे ४६५ कोटी रुपयांचे अनुदान वितरित केले आहे.

नाशिकमध्ये गुरुवारी शेतकऱ्यांवर लाठी चार्ज करण्यात आल्याबद्दल छेडले असता ते म्हणाले, शेतकऱ्यांवर लाठी चार्ज होणे ही दुर्दैवी बाब आहे. मला त्याबाबत माहीत नाही. मागील आर्थिक वर्षात देशातून ४ हजार ५०० कोटी रुपयांची कांदा निर्यात झाली. तर चालू वर्षात मागील ३ महिन्यात ९५७ कोटी रुपयांचा कांदा निर्यात करण्यात आला आहे. शेतकऱ्यांकडे शिल्लक असणारा कांदा येत्या दोन महिन्यांत तो टप्प्याटप्प्याने विक्री करतील आणि कांद्याला चांगला दर मिळणेदेखील अपेक्षित आहे. तसेच सर्वप्रथम शेतकरी आणि नंतर कांदा खाणाऱ्या ग्राहकांचादेखील विचार केला पाहिजे, असे सत्तार म्हणाले.

## शेतमालाच्या साठवणुकीसाठी दीर्घकालीन उपाययोजना हव्यात

शासनाकडून शेतकऱ्यांना कांदाचाळीच्या उभारणीसाठी मनरेगा योजनेतून सुमारे ८७ हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. हे अनुदान वाढविण्यासाठी शासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. कांदा, बटाटा, टोमॅटोसारख्या नाशवंत शेतमालाच्या साठवणुकीसाठी नव्याने काही योजना आणण्याचा विचार आहे. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार व काही विभागाच्या सचिवांबरोबर चर्चा झाली आहे. त्यानुसार शेतमालाच्या साठवणुकीसाठी दीर्घकालीन उपाययोजनांची आवश्यकता आहे. त्यासाठीही केंद्र सरकारकडे राज्याच्यावतीने मागणी करण्यात येईल, असेही सत्तार यांनी या वेळी स्पष्ट केले.

Maharashtra Times Dt. 25/08/2023

# ‘कांदा निर्यातशुल्काच्या पुनर्विचाराची मागणी’

म. टा. प्रतिनिधी, पुणे

‘राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन केंद्र सरकारकडे निर्यातीवर लावलेल्या ४० टक्के निर्यात शुल्काबाबत पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या रास्त मागणीचा पाठपुरावा करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यास राज्य सरकार कटिबद्ध आहे,’ असे पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी गुरुवारी सांगितले.

केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर लागू केलेल्या शुल्काबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रतिनिधी, व्यापारी आणि कांदा उत्पादक शेतकरी यांच्यासमवेत गुलटेकडी येथील पणन मंडळाच्या कार्यालयात सत्तार यांनी बैठक घेतली. या वेळी कृषी आयुक्त सुनील चव्हाण, पणन संचालक शैलेश कोथमिरे, राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक तथा सचिव संजय कदम, सरव्यवस्थापक तथा मॅग्नेटचे प्रकल्पाचे संचालक विनायक कोकरे, वखार महासंघाचे अध्यक्ष दीपक तावरे आणि निवृत्त पणन संचालक सुनील पवार आदी उपस्थित होते. या बैठकीस राज्यातील विविध कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव, कांदा उत्पादक शेतकरी, व्यापारी, आडतदार उपस्थित होते.

“ केंद्र सरकारने भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन संघ (नाफेड) आणि भारतीय राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघामार्फत (एनसीसीएफ) राज्यातील दोन लाख टन कांदा दोन हजार ४१० रुपये प्रति क्विंटल या दराने खरेदी करण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे. हा दर बाजारभावापेक्षा अधिक आहे.



– अब्दुल सत्तार, पणनमंत्री

Lokmat Dt. 25/08/2023

# कांदा निर्यात शुल्काबाबत शेतकऱ्यांना न्याय देऊ

## अब्दुल सत्तार : केंद्राने पुनर्विचार करावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर ४० टक्के निर्यात शुल्क लावले. या पार्श्वभूमीवर राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन केंद्र सरकारने पुनर्विचार करावा, अशी मागणी राज्य सरकारने केली आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यास सरकार कटिबद्ध आहे, अशी ग्वाही पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिली. गेल्या तीन महिन्यांत सुमारे एक हजार कोटींचा कांदा निर्यात झाल्याचेही त्यांनी सांगितले.



कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रतिनिधी, व्यापारी व कांदा उत्पादक शेतकरी यांच्यासमवेत बैठक घेऊन सत्तार यांनी ही माहिती दिली. यावेळी कृषी आयुक्त सुनील चव्हाण, पणन संचालक शैलेश कोतमिरे, राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक व सचिव संजय कदम, सरव्यवस्थापक व मॅग्नेटचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, वखार महासंघाचे अध्यक्ष दीपक तावरे, सुनील पवार उपस्थित होते.


सत्तार म्हणाले, सध्या देशात ४० ते ४५ हजार टन कांदा उपलब्ध असून, दर महिन्याला १७ ते १८ लाख टन कांद्याची मागणी असते. नवीन कांदा येईपर्यंत शिल्लक कांदा पुरेल. गेल्या वर्षी देशातून ४ हजार ५०० कोटी रुपयांचा कांदा निर्यात करण्यात आला होता. तर गेल्या तीन महिन्यांत ९९७ कोटींचा कांदा निर्यात करण्यात आला. आताही निर्यात सुरू असून शेतकरी निर्यात करू शकतात. मात्र, भविष्यातील परिस्थितीचा विचार करून केंद्र सरकारने हा निर्णय सर्व राज्यांसाठी लागू केला आहे.

केंद्र सरकारने नाफेड आणि भारतीय राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघामार्फत (एनसीसीएफ) राज्यातील २ लाख मेट्रिक टन कांदा २ हजार ४१० रुपये प्रतिक्विंटल या दराने खरेदी करण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांनी नाफेड आणि एनसीसीएफला कांदा विक्री करावी. त्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा केली जाईल. शेतकऱ्यांना नाफेडकडून वेळेवर पैसे मिळावेत यासाठी प्रयत्न केले जातील. नाफेडला ठरवून दिलेल्या जिल्ह्याव्यतिरिक्त इतर कांदा उत्पादन खरेदी केंद्रे उभारण्यासाठी प्रयत्न केले .

Kesari Dt. 25/08/2023

# राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यास शासन कटिबद्ध : मंत्री सत्तार

**पुणे** : केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर ४० टक्के निर्यात शुल्क लावल्यानंतर राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन राज्य शासनाने केंद्र सरकारकडे निर्यात शुल्काबाबत पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांच्या रास्त मागणीचा पाठपुरावा करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यास राज्य सरकार कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी केले.



केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर लागू केलेल्या शुल्काबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रतिनिधी व्यापारी व कांदा उत्पादक शेतकरी यांच्या समवेत गुलटेकडी येथील पणन मंडळाच्या कार्यालयात सत्तार यांनी बैठक घेतली. यावेळी राज्याचे कृषी आयुक्त सुनिल चव्हाण पणन संचालक शैलेश कोथमिरे, राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक तथा सचिव संजय कदम, सरव्यवस्थापक तथा मॅग्नेटचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, वखार महासंघाचे अध्यक्ष दीपक तावरे, निवृत्त पणन संचालक सुनील पवार आदी उपस्थित होते.

सत्तार यांनी कांदा उत्पादक शेतकरी, व्यापारी व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रतिनिधींच्या समस्या जाणून घेतल्या. ते म्हणाले, केंद्र सरकारने नाफेड आणि भारतीय राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघामार्फत राज्यातील २ लाख मेट्रीक टन कांदा २ हजार ४१० रुपये प्रतिक्विंटल या दराने खरेदी करण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे. हा दर बाजाराच्या दरापेक्षा जादा आहे.

केंद्र सरकार जागतिक बाजारपेठेच्या परिस्थितीचा विचार करून निर्णय घेत असते. केंद्र सरकारने जाहिर केलेला दर समाधानकरक असून, शेतकऱ्यांनी नाफेड आणि भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन संघाला कांदा विक्री करावी. प्रति क्विंटल २ हजार ४१० रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा होणार आहेत. शेतकऱ्यांना नाफेडकडून वेळेवर पैसे जमा व्हावेत यासाठी प्रयत्न केले जातील. नाफेडला ठरवून दिलेला जिल्ह्या व्यतिरिक्त इतर कांदा उत्पादन ठिकाणी खरेदी केंद्र उभारावी यासाठी प्रयत्न केले जातील.

राज्य सरकारने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ३५० रुपये प्रति क्विंटलप्रमाणे ४६५ कोटी रुपयांचे अनुदान वितरित केले असून, अशा प्रकारे अनुदान देणारे देशातील हे पहिले राज्य आहे. सरकारकडून शेतकऱ्यांना कांदा चाळीसाठी ८७ हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. हे अनुदान वाढविण्यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. कांदा हा नाशवंत पदार्थ आहे. त्याची साठवणूक जास्त दिवस टिकून राहावी, यासाठी शेतकऱ्यांना शीतगृह देण्याबाबत विचार सुरु आहे, असे सांगून सत्तार म्हणाले, राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे.

या बैठकीस राज्यातील विविध कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव, कांदा उत्पादक, शेतकरी, व्यापारी, आडतदार उपस्थित होते.

Agrowon Dt. 25/08/2023

# 'बाजार समिती कर्मचारी पदाधिकाऱ्यांसाठी अभ्यासक्रम'

**ॲग्रोवन वृत्तसेवा**



अब्दुल सत्तार

पुणे : राज्यातील बाजार समितीचे पदाधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी पणन मंडळामार्फत तळेगाव येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्र संस्थेत अभ्यासक्रम, प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करण्यात येईल, अशी माहिती पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी दिली.

मंत्री सत्तार यांनी बुधवारी (ता. २३) सायंकाळी तळेगाव येथील महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेला भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. या वेळी पणन संचालक शैलेश कोथमिरे, राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक तथा मॅग्नेटचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, संस्थेचे संचालक डॉ. सुभाष घुले, मॅग्नेट प्रकल्पाचे उपसंचालक अमोल यादव, संस्थेचे व्यवस्थापक विश्वास जाधव आदी उपस्थित होते.

आढावा बैठकीत श्री. सत्तार म्हणाले, संस्थेने इतर विभागांशी समन्वय साधून, राज्यातील जास्तीत जास्त शेतकरी, अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी यांना संबंधित विषयावरील प्रशिक्षण देण्यावर भर द्यावा. त्याचबरोबर कृषी पणन मंडळाने राज्यातील बाजार समिती यांच्या पदाधिकारी व अधिकारी कर्मचारी यांच्याकरिता राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण आयोजित करावे. यासाठीचा अभ्यासक्रम अद्ययावत करावा. प्रशिक्षणासाठी येणारा खर्च कृषी पणन मंडळाने संस्थेला द्यावा, जेणेकरून संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होईल.

त्याचप्रमाणे संस्थेने जिल्हा बँका, नाबार्ड, कौशल्य विकास व अल्पसंख्याक विभागाशी संपर्क साधून संस्थेत पूर्ण वर्षभर प्रशिक्षण कार्यक्रम सुरू राहण्यासाठी प्रयत्न करावेत. संस्थेने आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी उपलब्ध जागेचा पुरेपूर वापर करून नवीन प्रकल्प उभारावेत. संस्थेला पाणी उपलब्ध होण्यासाठी जिल्हा परिषद किंवा एमआयडीसी यांच्याकडे संपर्क साधावा, याकरिता आवश्यक ती मदत करता येईल, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

Pudhari Dt. 25/08/2023

# बाजार समितीचे पदाधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण सुविधा

**पणनमंत्री अब्दुल सत्तार यांची ग्वाही**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी पणन मंडळामार्फत तळेगाव येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेत (एनआयपीएचटी) सुविधा उपलब्ध करण्यात येईल, अशी ग्वाही पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिली. तसेच संस्थेत वर्षभर प्रशिक्षण कार्यक्रम सुरू राहण्यासाठी प्रयत्न करावेत आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी उपलब्ध जागेचा पुरेपूर वापर करून नवीन प्रकल्प उभारण्याची सूचनाही त्यांनी केली.

बुधवारी (दि.२३) सत्तार यांनी तळेगाव येथील महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेला भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी राज्याचे पणन संचालक शैलेश कोतमिरे, राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक तथा सचिव संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, एनआयपीएचटी संस्थेचे संचालक डॉ. सुभाष घुले, मॅग्नेट प्रकल्पाचे उपसंचालक अमोल यादव, संस्थेचे व्यवस्थापक विश्वास जाधव आदी उपस्थित होते.

सत्तार म्हणाले, 'कृषी पणन मंडळाने राज्यातील बाजार समित्यांच्या पदाधिकारी व अधिकारी-कर्मचाऱ्यांकरिता राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण आयोजित करावे. प्रशिक्षणासाठी येणारा खर्च कृषी पणन मंडळाने संस्थेला द्यावा, जेणेकरून संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होईल.'

पणन संचालक कोतमिरे म्हणाले, 'राज्यातील बाजार समितीच्या पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाबाबत परिपत्रक काढण्यात येईल.' कदम यांनी संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी सर्वोपतरी प्रयत्न करण्यात येतील.


या वेळी डॉ. घुले यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

Sakal Dt. 24/08/2023

# कांदा निर्यातीवर दहा वर्षांत वीस वेळा निर्बंध

## ‘अपेडा’ची माहिती; केंद्र सरकारच्या हस्तक्षेपामुळे चढ-उताराचे राजकारण

**किरण कवडे :**
सकाळ वृत्तसेवा




नाशिक, ता.२३ : कांदा निर्यातीवर केंद्र सरकारने ४० टक्के शुल्क लागू केल्यानंतर राज्यभरात त्याचे तीव्र पडसाद उमटत असताना गेल्या दहा वर्षांत तब्बल २० वेळा सरकारने निर्यातीमध्ये हस्तक्षेप केल्याचे ‘अपेडा’च्या माहितीवरून स्पष्ट झाले आहे.

सरकारने किमान निर्यात मूल्य कधी वाढविले तर शेतकऱ्यांचा दबाव वाढविल्यानंतर हे शुल्क घटविण्याचा देखील निर्णय घेतला. कांद्याभोवती फिरणाऱ्या राजकारणाला फक्त मोदी सरकारच नव्हे तर तत्कालीन काँग्रेस सरकारही जबाबदार असल्याचे यावरुन दिसून येते.

देशांतर्गत कांद्याची मागणी विचारात घेऊन केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने १९ ऑगस्ट २०२३ रोजी कांदा निर्यातीवर ४० टक्के शुल्क लागू करण्याचा निर्णय घेतला. मूळात महाराष्ट्रात लाल कांद्याची लागवड कमी प्रमाणात झालेली आहे. नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक कांद्याचे उत्पादन होते. उत्तर महाराष्ट्रात तर दुष्काळसदृश स्थिती असल्यामुळे कांदा लागवडीचा प्रश्नच नाही. अशा परिस्थितीत शेतकरी व व्यापारी यांच्याकडे असलेला कांदा बाहेरच्या देशात गेल्यास देशांतर्गत बाजारात कांद्याचे दर वाढण्याची भीती केंद्र सरकारला वाटते. त्यामुळे निर्यातीवर शुल्क लागू करून भाव नियंत्रणात ठेवण्याचे नियोजन सरकारने केलेले दिसते. पण हे काही फक्त भाजपच्या काळात झाले असे नाही तर, तत्कालीन काँग्रेस सरकारने देखील कांदा निर्यातीवर वेळोवेळी निर्बंध लावले आहेत. केंद्र सरकार सातत्याने कांदा निर्यातीमध्ये हस्तक्षेप करून भाव नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करत असल्याचे शासकीय आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. निर्यात शुल्क अधिनियम १९६२ च्या आधारे निर्यात शुल्क ठरवले जाते. दोन वर्षांपूर्वी कांदा साठवणुकीवरही निर्बंध लादण्यात आले होते.

केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत ४० टक्के शुल्क लागू करण्याचा निर्णय घेतल्यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू तरळले आहेत.

> निर्यात प्रतिबंधित करण्याचा निर्णय सरकारला अल्पकाळासाठी फायद्याचा वाटत असला तरी दीर्घकाळासाठी तोट्याचा ठरणार आहे. यामुळे निर्यातीची बाजारपेठही हातातून जाईल. निर्यातीबाबत सातत्याने धरसोडीचे धोरण पाकिस्तान, चीन आदी स्पर्धक कांदा उत्पादक देशांच्या पथ्यावर पडते.
>
> **- दीपक चव्हाण,**
> कृषी अभ्यासक

Lokmat Dt. 23/08/2023

# सरकार खरेदी करणार कांदा

## उपमुख्यमंत्री फडणवीस यांची जपानमधून घोषणा | वाणिज्यमंत्री गोयल-कृषिमंत्री मुंडे चर्चा सुरू असताना निर्णय जाहीर | राज्यातून उचलणार २ लाख टन माल, भाव २४१०/क्विंटल

सुनील चावके
लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कांदा निर्यातीवर ४० टक्के शुल्कवाढीमुळे महाराष्ट्रात कांद्याचे भाव गडगडण्याची शक्यता निर्माण झाल्याने मंगळवारी केंद्राने राष्ट्रीय कृषी सहकारी पणन संघ (नाफेड) आणि भारतीय राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघ (एनसीसीएफ) यांच्यामार्फत राज्यातील २ लाख मेट्रिक टन कांदा प्रतिक्विंटल २,४१० रुपये दराने खरेदी करण्याची घोषणा केली. राजधानी दिल्लीत राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांच्यासोबत मंगळवारी कांदा उत्पादकांच्या प्रश्नावर चर्चा सुरू असताना जपानमधून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्राच्या या निर्णयाची ट्विटरवर घोषणा केली.

अहमदनगर, नाशिक, लासलगावसह विविध केंद्रांवरून २ लाख टन कांदा खरेदी करण्यात येणार असून, आवश्यकता भासल्यास २ लाख टनांपेक्षाही जास्त कांदा खरेदी केला जाईल. या खरेदीची सुरुवात मंगळवारी दुपारी १२ पासूनच सुरू होत असल्याची घोषणा पीयूष गोयल यांनी केली. सकाळी दहा वाजता ८, तीन मूर्ती मार्ग या पीयूष गोयल यांच्या निवासस्थानी कांद्याच्या प्रश्नावर निवेदन सादर करून धनंजय मुंडे यांच्याशी चर्चा करीत असताना साडेदहा वाजता ट्वीट करीत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्राच्या कांदा खरेदी निर्णयाची माहिती दिली. मुंडे-गोयल यांची बैठक सव्वाअकरा वाजता संपली.

-संबंधित वृत्त/ महाराष्ट्र



नाशिक जिल्ह्यातील विंचूर कांदा बाजारात कांद्याची आवक मोठ्या प्रमाणात झाली. पण लिलाव बंद होते.

### सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी

केंद्र व राज्य सरकार कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी असून यापूर्वीही नाफेड व एनसीसीएफमार्फत राज्यातील ३ लाख मेट्रिक टन कांदा केंद्र सरकारने खरेदी केला आहे. आता आणखी २ लाख मेट्रिक टन कांदा २४१० प्रतिक्विंटल भावाने खरेदी करण्यात येत असून, कांद्याचे भाव उत्पादक आणि ग्राहकांच्या दृष्टीने संतुलित ठेवण्यासाठी सरकार प्रयत्नशील राहील. - पीयूष गोयल, केंद्रीय वाणिज्यमंत्री

### कांद्याला ४ हजार रुपये दर द्यावा

केंद्र सरकारने प्रतिक्विंटल २,४१० रुपये दराने कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेतला असून, हा दर कमी आहे. या दरात शेतकऱ्यांनी कांदा उत्पादनासाठी केलेला खर्चही निघणार नाही. त्यामुळे सरकारने कांद्याला प्रतिक्विंटल ४ हजार रुपये दर द्यावा. - शरद पवार, अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

### जपानमधून फडणवीस यांनी हलविली सूत्रे

'राज्यातील कांदा उत्पादकांच्या प्रश्नासाठी आमचे नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्याशी जपानमधून दूरध्वनीवर संपर्क केला. केंद्र सरकारने २ लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेतला असून, महाराष्ट्रातील कांदा उत्पादकांचे हित जपण्यासाठी नाशिक आणि अहमदनगर येथे विशेष खरेदी केंद्र सुरु करण्यात येतील, अशी घोषणा त्यांनी केली आहे. प्रतिक्विंटल २४१० या दराने ही खरेदी करण्यात येईल. यातून मोठा दिलासा आपल्या राज्यातील कांदा उत्पादकांना मिळेल,' असे फडणवीस यांनी या ट्वीटमध्ये म्हटले आहे.

मंगळवारी सकाळी साडेसहा वाजता अजित पवार हे गोयल यांच्याशी दूरध्वनीवर बोलले. मुख्यमंत्री शिंदेंचे गोयल यांना तीन वेळा फोन आले. उत्पादकांचे नुकसान होऊ नये ही कृषिमंत्री म्हणून माझ्यावरही जबाबदारी आहे. - धनंजय मुंडे, कृषिमंत्री

## कस्टम म्हणते, शुल्क भरा मगच कांदा पाठवा!

मधुकर ठाकूर
लोकमत न्यूज नेटवर्क

**उरण :** आधी शुल्क भरा त्यानंतरच कांद्याचे कंटेनर कार्गो निर्यात करा, अशी ताठर भूमिका सीमाशुल्क विभागाने घेतल्याने कांद्याचे सुमारे ७० स्थानिक कंटेनर माघारी गेले आहेत. आर्थिक नुकसान टाळण्यासाठी ४० टक्के शुल्क भरल्यानंतर कांद्याचे ४० कंटेनर कार्गो मंगळवारी निर्यातीच्या तयारीत असल्याची माहिती स्वान ओव्हरहेड या निर्यात कंपनीचे मालक राहुल पवार यांनी दिली.

सरकारने निर्यात शुल्क थेट ४० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला. केंद्र सरकारच्या निर्णयाआधीच जेएनपीए बंदरातच कांद्याचे सुमारे २०० कार्गो कंटेनर होते. ते सर्व सीमाशुल्क विभागाने अडवून ठेवले होते. कांद्याचे ६० ते ७० कंटेनर कार्गो व्यापाऱ्यांनी माघारी धाडल्याची माहिती निर्यातदार आणि बच्चूभाई अॅण्ड कंपनीचे मालक इरफान मेनन यांनी दिली.

### सोलापूरमध्ये कांद्याला २,७०० रुपयांचा भाव

**सोलापूर :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याला सध्या सरासरी १,५०० ते २,७०० रुपयांचा दर मिळत आहे. सोमवारी ११० ट्रक कांद्याची आवक झाली होती. मंगळवारी त्यात वाढ होऊन १५० ट्रक झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

Maharashtra Times Dt. 22/08/2023

मटा गाइड

राज्यातील तीन लाख ३६ हजार ४७६ शेतकरी यंदा कांदा अनुदानासाठी पात्र ठरले आहेत. त्यांच्यासाठी पणन संचालनालयाने ८४४ कोटी ५६ लाख रुपयांची राज्य सरकारकडे मागणी केली आहे. पैकी ४६५ कोटी ९९ लाखांचा निधी सरकारने मंजूर केला आहे. १० कोटी रुपयांपेक्षा कमी आणि त्यापेक्षा जास्त अनुदानाची मागणी असलेल्या २३ जिल्ह्यांतील उत्पादकांना पहिल्या टप्प्यांत अनुदान दिले जाणार आहे.



# सव्वातीन लाख शेतकरी कांदा अनुदानासाठी पात्र

## अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर

पात्र शेतकऱ्यांच्या अनुदानासाठी ८४४ कोटी ५६ लाख ८१ हजार ७७५ रुपयांची मागणी पणन संचालनालयाने सरकारकडे केली होती. एकूण मागणीपैकी सरकारने ४६५ कोटी ९९ लाख रुपयांच्या अनुदानाला मान्यता दिली. तेवढाच निधी शेतकऱ्यांच्या खात्यात वितरित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे आता शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट अनुदानाची रक्कम जमा होणार आहे.



## सव्वाचार लाख शेतकऱ्यांचे अर्ज

राज्यात फेब्रुवारीमध्ये कांद्याच्या दरात घसरण झाल्याने एक फेब्रुवारी ते ३१ मार्च दरम्यान लेट खरीप हंगामात लाल कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय सरकारने घेतला. त्यानुसार, प्रति क्विंटल ३५० रुपये तसेच जास्तीत जास्त प्रति शेतकरी २०० क्विंटल अनुदान देण्याचे ठरले होते. त्या पार्श्वभूमीवर, शेतकऱ्यांची यादी पणन संचालनालयाने तयार केली. राज्यातील चार लाख १३ हजार ८३ शेतकऱ्यांनी अनुदानासाठी बाजार समित्यांकडे अर्ज केले होते. छाननीनंतर तीन लाख ३६ हजार ४७६ शेतकरी पात्र ठरले.




## तेवीस जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना अनुदान

दहा कोटी रुपयांपेक्षा कमी अनुदानाची मागणी १३ जिल्ह्यांनी केली होती. सातारा, सांगली, ठाणे, अमरावती, बुलढाणा, चंद्रपूर, वर्धा, लातूर, नागपूर, रायगड, यवतमाळ, अकोला, वाशीम या जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना संपूर्ण अनुदानाची रक्कम देण्याचा निर्णय सरकारने घेतला. १० कोटी रुपयांपेक्षा जास्त अनुदानाची रक्कम पुणे, सोलापूर, नगर, उस्मानाबाद, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, धुळे, जळगाव, बीड, कोल्हापूर या १० जिल्ह्यांतील उत्पादकांना ५३.९४ टक्के या प्रमाणात वितरित करण्यात येणार आहे. या योजनेखाली दुसऱ्या टप्प्यातील निधी प्राप्त झाल्यानंतर उर्वरित लाभार्थ्यांना वितरित करण्यात येणार आहे.

## पुणे जिल्ह्यात ₹ ३६ कोटींचे वितरण

दहा कोटी रुपयांपेक्षा कमी अनुदान देय असलेल्या १३ जिल्ह्यांसाठी २२ कोटी ६० लाख ५१ हजार ९७४ रुपयांची गरज होती. त्यानुसार सर्व रक्कम वितरित करण्यात आली आहे. १० कोटी रुपयांपेक्षा जास्त अनुदान असलेल्या १० जिल्ह्यांत ४४३ कोटी ३७ लाख ३३ हजार ९९४ रुपयांची गरज होती. पैकी ३७८ कोटी ५८ लाख ९५ हजार ८०७ रुपयांचे वाटप करण्यात येणार आहे. पैकी पुणे जिल्ह्यातील लाभार्थ्यांना ५४.९४ टक्के प्रमाणात निधी देण्यात येणार आहे. जिल्ह्यात सध्या ६६ कोटी ८९ लाख सहा हजार ६९८ रुपये निधी आवश्यक आहे. त्यानुसार, सध्या ३६ कोटी आठ लाख १९ हजार ६४५ रुपये निधी वितरित करण्यात येणार आहे.



**चार लाख १३ हजार ८३**
अनुदानासाठी एकूण अर्ज

**तीन लाख ३६ हजार ४७६**
अनुदानपात्र एकूण अर्ज

**₹ ८४४ कोटी ५६ लाख**
अनुदानाची एकूण रक्कम

**₹ ४६५ कोटी ९९ लाख**
अनुदानाची मंजूर रक्कम

Lokmat Dt. 21/08/2023

# केंद्र सरकार पुन्हा खरेदी करणार २ लाख टन कांदा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कांदा निर्यातीवर ४० % शुल्क लागू करण्याची घोषणा केल्यानंतर केंद्र सरकारने या वर्षासाठी बफर स्टॉक ५ लाख टन करण्याचे जाहीर केले. त्यासाठी अतिरिक्त दोन लाख टन कांदा खरेदी करणार आहे.

यंदाच्या वर्षासाठी ३ लाख टन कांद्याच्या बफर स्टॉकचे लक्ष्य ठेवले होते. दरवाढ रोखण्यासाठी हा साठा वापरला जातो. आकडेवारीनुसार, रविवारी देशातील कांद्याचे सरासरी दर २९.७३ रुपये प्रतिकिलो होते. गतवर्षी हे दर २५ रुपयांवर होते.

## दिल्लीत २५ रुपये भाव

नागरिकांना दिलासा देण्यासाठी भारतीय राष्ट्रीय सहकारी उपभोक्ता महासंघ सोमवारपासून दिल्लीत २५ रुपये प्रतिकिलो दराने कांद्याची विक्री करणार आहे.

**प्रमुख शहरांतील दर (प्रतिकिलो)**

| | |
|---|---|
| नवी दिल्ली | ३७ |
| **मुंबई** | **३०** |
| चेन्नई | ३६ |
| **हैदराबाद** | **२३** |
| भुवनेश्वर | ३५ |



(स्रोत : ग्राहक व्यवहार मंत्रालय)

# डाळिंबाची पहिली निर्यात खेप अमेरिकेला रवाना

Punyanagari Dt. 09/08/2023

**नवी दिल्ली :** फळांच्या निर्यात संधीना चालना देण्याच्या उद्देशाने वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयांतर्गत कृषी उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाने (अपेडा) प्रायोगिक तत्त्वावर पहिल्या चाचणी अंतर्गत ताज्या डाळिंबाची पहिली निर्यात खेप अमेरिकेला हवाई मार्गाने रवाना केली आहे. डाळिंबाच्या आयातदारांकडून उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत आहे.

डाळिंबाची निर्यातीची ही पहिली खेप, अपेडाने, भारताची राष्ट्रीय वनस्पती संरक्षण संघटना (एनपीपीओ), अमेरिकेची प्राणी आणि वनस्पती आरोग्य तपासणी सेवा (यूएस-एपीएचआयएस),



महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ (एमएसएएमबी) आणि भारतीय कृषी संशोधन परिषद-डाळिंबावरील राष्ट्रीय संशोधन केंद्र, सोलापूर (राष्ट्रीय संशोधन केंद्र-सोलापूर) आणि इतर संस्थांच्या सहकार्याने अमेरिकेला रवाना केली आहे. अमेरिकेला होत असलेल्या डाळिंब निर्यातीत वाढ झाल्यास परिणामी डाळिंबाला चांगला दर मिळेल आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल,

मोठ्या प्रमाणात अँटी ऑक्सिडंट तत्त्व आणि उत्कृष्ट फळांच्या वैशिष्ट्यांमुळे, महाराष्ट्रातील 'भगवा' या प्रकारच्या डाळिंबामध्ये मोठ्या प्रमाणात निर्यात क्षमता आहे. डाळिंबाच्या भगवा या वाणाला परदेशी बाजारपेठांमध्ये तुलनेने अधिक मागणी आहे.

महाराष्ट्रातील सोलापूर या जिल्ह्यात संपूर्ण देशभरातील डाळिंबाच्या उत्पादनापैकी ५० टक्के उत्पादन होते. डाळिंबाच्या उत्पादनात भारत जगात सातव्या क्रमांकावर आहे आणि एकूण लागवडीखालील क्षेत्र सुमारे २,७५,५०० हेक्टर आहे.

असे अपेडाचे अध्यक्ष अभिषेक देव यांनी सांगितले. निर्यात मूल्य साखळीत मागोवा घेण्याची प्रक्रिया सुलभ करण्याच्या उद्देशाने अपेडाने विकसित केलेली प्रणाली अनरनेट अंतर्गत शेतांची नोंदणी करण्यासाठी राज्य सरकारांच्या सहकार्याने नियमितपणे जागृतीपर कार्यक्रम आयोजित केले जातात. अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये भारतात तयार झालेल्या उच्च दर्जाच्या डाळिंबाच्या निर्यातीला परवानगी मिळावी, यासाठी बाजारपेठ उपलब्ध करण्यामध्ये अपेडाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

# डाळिंब निघाले अमेरिकेला

Pudhari Dt. 09/08/2023

**नवी दिल्ली :** कृषी उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाने (अपेडा) हवाईमार्गे अमेरिकेला पहिली डाळिंबाची खेप रवाना केली. परदेशी बाजारपेठेत भगवा जातीच्या डाळिंबाला चांगली मागणी आहे. डाळिंबात अँटिऑक्सिडंटचे प्रमाण अधिक असल्याने या फळाला



मोठी परदेशी बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते. अमेरिकेतून मागणी वाढल्यास त्याचा फायदा डाळिंब उत्पादकांना होईल. भारत देश डाळिंब उत्पादनात जगात सातव्या क्रमांकावर आहे. देशात डाळिंबाचे एकूण लागवडीखालील क्षेत्र २ लाख ७५ हजार ५०० हेक्टर आहे. देशातील एकूण उत्पादनापैकी निम्मे उत्पादन महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात होते. त्यामुळे निर्यातवाढीचा सर्वाधिक फायदा महाराष्ट्रालाच होणार आहे. भारतीय कृषी परिषद आणि डाळिंब राष्ट्रीय संशोधन केंद्र, सालोपूर यांच्या सहकायनि डाळिंबाची निर्यात करण्यात आल्याची माहिती अपेडाचे अध्यक्ष अभिषेक देव यांनी दिली.

Maharashtra Times Dt. 09/08/2023

# शेतमाल विक्रीचे पैसे तत्काळ द्या

## पणन संचालकांचे बाजार समित्यांसह अडत्यांना आदेश

म. टा. प्रतिनिधी, पुणे

बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात शेतकऱ्याने शेतमालाची विक्री केल्यानंतर अडत्यांकडून तातडीने शेतमालाचे वजन होताच पैसे देणे अपेक्षित आहे. वजन होताच अडत्याने पैसे न दिल्यास संबंधितावर कारवाई करण्याचे आदेश पणन संचालक शैलेश कोतमिरे यांनी दिले आहेत.

काही बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांनी शेतमाल विक्री केल्यानंतर आणि त्यांचे वजन झाल्यानंतर व्यापाऱ्याकडून त्याच दिवशी शेतकऱ्याला रक्कम दिली जात नसल्याच्या तक्रारी पणन संचालनालयाला प्राप्त झाल्या आहेत. त्याशिवाय व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्याने त्याने विक्री केलेल्या शेतमालाची योग्य किंमत मिळत नाही किंवा विक्री किंमत दिली जात नाही आणि फसवणूक केली जाते; तसेच काही ठिकाणी व्यापारी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याकडून माल खरेदी करून त्याची विक्री किंमत न देता फसवणूक करून पळून जातात, अशाही तक्रारीही आल्याचे संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे. त्या तक्रारींचे गांभीर्य ओळखून पणन संचालकांनी विक्रीच्या दिवशीच शेतकऱ्याच्या खात्यावर त्याची रक्कम जमा करण्याचे आदेश दिले आहेत.

बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक होत असेल किंवा त्यांच्या शेतमालाच्या विक्रीएवढी रक्कम मिळत नसल्याचे आढळल्यास त्यासंदर्भात बाजार समितीने आपल्या अधिकाऱ्यांमार्फत बाजारातील अडत्यांच्या हिशेबाच्या पुस्तकांची नियतकालिक तपासणी करावी. त्या संदर्भात चौकशी करण्याचे आदेशही पणन संचालकांनी काढलेल्या परिपत्रकात दिले आहेत. एखाद्या व्यापाऱ्याने शेतकऱ्याला पैस दिले नसल्याचे आढळल्यास व्यापाऱ्याने बाजार समितीकडे ठेवलेल्या अनामत रकमेतून ते देण्यास किंवा ज्या बँकेने हमी दिली आहे त्या बँकेस ते पैसे देण्याविषयीचे आदेश द्यावेत, अशी कायद्यात तरतूद आहे.

### ...तर कारवाई होणार

'नियमांचे पालन न करणाऱ्या बाजार समितीतील आडत्यांवर वेळीच कारवाई करा,' असे आदेश पणन संचालकांनी दिले आहेत. त्या संदर्भात सहकारी संस्थांच्या जिल्हा निबंधक आणि सहायक निबंधकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील बाजार समित्यांमध्ये वारंवार भेटी द्याव्यात. बाजार समितीत खरेदी-विक्री झालेल्या शेतमालाची किंमत शेतकऱ्यांना योग्य वेळी दिली जाते किंवा कसे याबाबत खात्री करावी. परिपत्रकाचे पालन होते, की नाही याची खातरजमा करावी, अशाही सूचना त्यांनी दिल्या आहेत.

### खरेदी-विक्रीची माहिती घ्या

बाजार समितीने बाजार आवारात शेतमालाचे लिलाव झाल्यानंतर त्याच दिवशी आवारातील सर्व व्यापारी, अडत्यांकडे जाऊन किती शेतमालाची खरेदी झाली, त्याची विक्री किंमत काय; तसेच शेतलमाची शेतकऱ्यांना किती किंमत अदा केली, याची माहिती घेणे आवश्यक असल्याचे आदेशही पणन संचालकांनी दिले आहेत.



संग्रहित छायाचित्र

# सिट्रस इस्टेटमध्येच संत्रा प्रक्रिया केंद्रांना प्राधान्य द्या

## अवर सचिवांचे कृषी पणन मंडळाच्या कार्यकारी संचालकांना निर्देश

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

नागपूर : संत्र्याकरिता पणन विभागाने नागपूर, काटोल, कळमेश्वर, मोर्शी (अमरावती), बुलडाणा येथे स्वतंत्र प्रक्रिया केंद्राचा प्रस्ताव दिला आहे. याच जिल्ह्यांत राज्य शासनाने सिट्रस इस्टेटची उभारणी केली असल्याने प्रक्रिया केंद्र याच इस्टेट परिसरात उभारली जावी, अशी सूचना राज्य शासनाच्या अवर सचिव माधवी शिंदे यांनी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या कार्यकारी संचालकांना केली आहे.

संत्र्याची उत्पादकता व दर्जा सुधार या उद्देशाने ७ मार्च २०१९ च्या शासन आदेशान्वये सिट्रस इस्टेटच्या उभारणीला मान्यता देण्यात आली आहे. नागपूर, अमरावती, बुलडाणा जिल्ह्यांत या सिट्रस इस्टेट प्रस्तावित आहेत. कृषी विभागाच्या माध्यमातून या तीनही सिट्रस इस्टेटचे संनियंत्रण होते. या सिट्रस इस्टेट पूर्णपणे कार्यान्वित झाल्या असल्यास त्यांची फलनिष्पती काय, असा प्रश्न उपस्थित करीत त्या कार्यान्वित झाल्या असल्यास याच सिट्रस इस्टेटच्या अंतर्गत संत्रा प्रक्रिया केंद्र उभारता येईल किंवा काय, असा दुसरा प्रश्न शासनस्तरावरून उपस्थित करण्यात आला आहे. पत्रानुसार, सद्यःस्थितीत राज्यातील अमरावती, नागपूर व अकोला या क्लस्टर जिल्ह्यांत १९ शीतगृह (कोल्डस्टोरेज), ६ पॅक हाऊस व २१ ग्रेडिंग, वॅक्सिंग युनिट आहेत.

### प्रक्रिया केंद्रांबाबत उत्सुकता

राज्यात संत्र्यासोबतच केळी, आंबा व इतरही फळपिके घेतली जातात. त्यामुळे संत्रा या एकाच फळपिकाकरिता प्रक्रिया केंद्र उभारणे संयुक्तिक ठरणार नाही, असेही पत्रात नमूद आहे. परिणामी ही प्रक्रिया केंद्रे उभी राहतात किंवा नाही हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

Agrowon Dt. 01/08/2023